# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- registrar@unigug.ac.in दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./२०७५/२०२२ दि. १५ /०६/२०२२

**अत्यंत महत्त्वाचे**

## सुचना

**विषय :- विद्यापीठात येताना मास्क घालूनच प्रवेश करण्याबाबत.**

संदर्भ :- जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली यांचे कार्यालयीन पत्र जिका/क्र/कार्या-३/अका.आव्यक/ कावी-५०१/२०२२, दि. १४/०६/२०२२.

सर्व संबंधितांना याद्वारे सुचित करण्यात येते की, सध्या कोव्हिड-१९ चे रुग्ण वाढत असल्याने सदर साथरोगाचा प्रादुर्भाव व रोखथाम नियंत्रित करण्याकरीता सर्व शासकीय/निमशासकीय, खाजगी,औद्योगिक आस्थापना, सार्वजनिक संस्था येथे तसेच सार्वजनिक स्थळी मास्कचा वापर बंधनकारक करुन बिना मास्क नागरीक / व्यक्ती आढळल्यास/ नियमाचे कसूर केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितास जबाबदार धरुन दंड रु. ५००/- वसूल करण्याची कारवाई करण्याबाबत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली यांचे संदर्भिय पत्र निर्गमित झाले आहे.

त्याअनुषंगाने कोव्हिड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणून विद्यापीठातील सर्व अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी विद्यार्थी-विद्यार्थीनी तसेच बाहेरुन येणारे सर्व अभ्यांगत यांना विद्यापीठ परिसरात व कार्यालयात तोंडावर मास्क घालणे बंधनकारक करण्यात येत आहे. अन्यथा संबंधितावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

तसेच कोव्हिड-१९ च्या पार्श्वभुमीवर अपेक्षित असलेल्या कोव्हिड-१९ अनुरुप वर्तनांचे कोटकोरपणे पालन करणे आवश्यक आहे, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

संलग्न - वरीलप्रमाणे

15.6.2022

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव :-

१. मा. कुलगुरु महोदयांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
४. सर्व प्रशासकिय/शैक्षणिक विभागांचे मा. विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदरहू सुचनापत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थीनी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.
५. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर सुचनापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
६. मा. मुख्य कार्यक्रम अधिकारी, एस.टी.आर.सी., गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
७. पर्यवेक्षक, थर्ड आय सेक्युरिटी सर्व्हिसेस, गोंडवाना विद्यापीठ कार्यक्षेत्र यांनी सदर सुचनापत्रक विद्यापीठात कार्यरत असलेल्या आपल्या अधिनस्त सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे व बिनामास्कने विद्यापीठात कोणालाही प्रवेश न देण्याबाबत संबंधित सुरक्षा रक्षकांना सुचित करावे.
८. आस्थापना विभाग (नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. विजय सिलारे)**
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली